# लाड महाविद्यालयात पारंपरिक दिन साजरा

**कुंडल : वार्ताहर**

येथील क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयात येथे पारंपरिक दिवस उत्साहात संपन्न झाला विद्यार्थ्यांनी आकर्षक वेशभूषेत वेगवेगळे कलाविष्कार सादर केले.

त्यामध्ये आदिवासी वेशभूषा आकर्षक ठरली. आदिवासी वेशभूषेत प्रशांत चव्हाण, दीपक गावडे, ओंकार चव्हाण, पोतराज जगन्नाथ यादव, मयूर आवटे, गजी ढोल चेतन एडके, विकास एडके, भंगारवाले अविनाश जाधव, श्रेयस पाकले आदी विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यांचे यावेळी कौतुक करण्यात आले. कार्यक्रमास प्राचार्य डॉ. के. एम. नलावडे, प्रा. व्ही. आर. माने, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

दै. केसरी ता. 5/02/2016

# कुंडलमध्ये आज शिक्षक परिषदेचे अधिवेशन

**कुंडल : वार्ताहर**

शिवाजी विद्यापीठ वाणिज्य व व्यवस्थापन शिक्षक परिषदेचे १४ वे वार्षिक अधिवेशन कुंडल येथे क्रांती सहकारी साखर कारखाना कार्यस्थळी रविवार, दि. २१ रोजी संपन्न होत आहे. या अधिवेशनात कौशल्य विकासावर चर्चासत्र होणार असून क्रांती सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अरुण लाड व कार्यकारी संचालक सी. एस. गव्हाणे हे मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमासाठी शिवाजी विद्यापीठ अंतर्गत सर्व महाविद्यालयातील वाणिज्य व व्यवस्थापन विभागातील सर्व प्राध्यापकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. एम. नलावडे यांनी केले आहे.

दै. केसरी. दि-21/02/2016

महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी केलेल्या विविध वेषभूषा.

## जी.डी.बापू महाविद्यालयात विविध उपक्रम

कुंडल (वार्ताहर) : येथील क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयात पारंपरिक दिवस उत्साहात झाला. महाविद्यालयीन युवकांनी वेगवेगळ्या वेषभूषा परिधान करीत आपल्या कलागुणांना वाव दिला. यामध्ये प्रशांत चव्हाण, दीपक गावडे, जगन्नाथ यादव, ओंकार गोरड, सुहास शिंदे, सुशांत ठोंबरे, पवन नलवडे, अरूण एडके, कुमार चव्हाण, मयूर आवटे, चेतन एडके, विकास एडके, संदीप मुळीक, अविनाश गर्जे आदींनी सहभाग घेतला. खाद्य महोत्सवाचे उद्घाटन युवक राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष शरद लाड यांच्याहस्ते करण्यात आले. संयोजन प्राचार्य डॉ. के. एम. नलावडे यांच्यासह प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले.

## ...ज्ञानाचा उपयोग समाज हितासाठी करा : प्राचार्य जाधव

कुंडल : वार्ताहर

विद्यार्थ्यांनी व्यवसायिक शिक्षणाबरोबरच समाजोपयोगी ज्ञान संपादन करून त्याचा उपयोग समाजाच्या हितासाठी करणे गरजेचे आहे, असे मत प्राचार्य एल. जी. जाधव यांनी व्यक्त केले.

कुंडल येथील क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभप्रसंगी ते बोलत होते.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. के. एम. नलावडे यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी - विद्यार्थिनी उपस्थित होते. सुत्रसंचलन प्रा. गणेश खारगे यांनी केले. आभार प्रा. व्ही. आर. माने यांनी मानले.

दै. पुढारी ता ०६/०२/२०१६

# महाविद्यालयात पारंपारिक दिन उत्साहात



**कुंडल : महाविद्यालयात पारंपारिक वेशभूषेत उपस्थित विद्यार्थी.**

वार्ताहर
कुंडल

कुंडल येथील कांतीअग्रणी जी.डी.बापु लाड महाविद्यालयामध्ये पांरपारिक उत्सहामध्ये संपन्न झाला. यावेळी विद्यार्थ्यांनी आकर्षक व वेगवेगळया वेशभुषा परिधान करुन आापला कलाविष्कार सादर केला. विद्यार्थ्यांनी यावेळी आदिवासी पोतराज या वेशभुषे बरोबर गर्जा ढोलवादन भंगारवाला आदी वेशभुषा सादर केल्या.

प्रशांत चव्हाण, दिपक गावडे, जगन्नाथ यादव, ओंकार गोरड, सुहास शिंदे, सुशांत ठोंबरे, बबन नलवडे, अरुण एडके, संदिप दुकळे, अविनाश गर्जे, प्रणव ओठे, वैभव होवाळ, अविनाश जाधव, आदी विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. तसेच यानिमीत्त महाविद्यालयामध्ये फुड फेस्टीवल चे ही आयोजन करणेत आले होते. या फुड फेस्टीवल चे उदघाट्न सांगली जिल्हा युवक राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद लाड यांचे हस्ते करण्यात आले.

संयोजन प्राचार्य के.एम.नलवडे यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.व्ही. आर. माने, तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले.

06 02 2016